# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली, दिनांक २०/०२/२०१८

## पोलीस अधिका-यांडून शहीद कुटुंबियांना आर्थिक मदत

आज रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयात मा. अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली महेंद्र पंडित साो, मा. पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी साो. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी (अभियान) मा. समीर साळवे साो यांच्या प्रमूख्र उपस्थित पार पाडलेल्या कार्यक्रमात गडचिरोली जिल्हयातील विविध पोस्टे, उपपोस्टे, पोमके, स्तरावर आपली सेवा बजावत असलेल्या सत्र क्रमांक ११३ च्या पोलीस उपनिरिक्षकां तर्फे शहीद कुटुंबातील गरजू व्यक्तीना प्रत्येकी रुपये २१००० ची आर्थिक  मदत करण्यात आली.

यावेळी सत्र क्रमांक ११३ तर्फे मनोगत व्यक्त करतांना पोलीस उपनिरीक्षक दाजी देठे यांनी सांगतिले कि, माओवादयांचा सामना करत असतांना अनेक शूरवीर जवानांना  वीरगती प्राप्त  झाली आहे. या वीर जवानांचे बलिदानाने त्यांच्या कुटूंबाचे होणारे नुकसान कधीही भरुन निघू शकत नाही. आमच्या सत्र क्रमांक ११३ ने थोडया प्रमाणात या कुटूंबांना आर्थिक मदत देऊ केली आहे. यामध्ये शहीद पालदेव सडमेक यांच्या मातोश्री सरुबाई सडमेक, शहीद श्रावण उसेंडी यांच्या मातोश्री मुक्ताबाई उसेंडी, शहीद बिरसाई आत्राम यांच्या पत्नी वनिताबाई आत्राम या विरांच्या कुटूंबातील व्यक्तींना आम्ही सर्वजन एकत्र येऊन सर्वोतर्फे  आर्थिक मदत करीत आहोत.

याप्रसंगी मा. अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली महेंद्र पंडित साो. यांनी सत्र क्रमांक ११३ चे कौतून करुन त्यांच्या या नावीन्यपुर्ण उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात सत्र क्रमांक ११३ चे पोलीस उपनिरीक्षक  बसवराज माळी, अवधूत शिंगारे, युवराज घोडके, यश बोराटे, वर्षा नैताम, सुधा चौधरी, शेष मोरे, अविनाश ढमे, राजेश गावडे हे उपस्थित होते.


GADCHIROLI POLICE
FORTUNE FAVOURS THE BRAVE